ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय (ग्रा.प.) लोकप्रतिनिधी च्या भूमिकेत कार्यक्षमतेत झालेला बदल

**सुनिल मोतीराम सोनवणे**
कनकवली कॉलेज, कनकवली

★★★

**संशोधन सारांशः (Research Abstract)** : भारतीय सविधानाने ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे पंचायतीराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्रदान केला आहे. त्यामुळे पंचायतराज संस्थातील पदाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्य यामध्ये लक्षणीय वाढझालेली आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाने अनेक विकास योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपवलेली आहे. ग्रामपंचायतीला विविध विकास योजनांतर्गत वेळोवेळी निधी मिळत असून त्याचा सुयोग्य विनियोग होणे आवश्यक आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभागाद्वारे ग्रामपंचायतीनी केलेल्या विकासकृती आराखडयानुसार गावाचा विकास करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत जबाबदारी आहे.

ग्रामपंचायत लोकप्रतिनिधींना त्यांच्या अधिकाराचा वापर, कर्तव्ये व जबाबदारी सक्षमपणे व अचूकरित्या पार पाडता यावी म्हणून त्यांना पायाभूत प्रशिक्षण, मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेतर्गत देण्यात आले. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेतील वाढत्या सहभागाचा अभ्यास करणे, B. R. G. F. प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोक-प्रतिनिधीच्या भूमिकेत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे. B. R. G. F. प्रशिक्षणातून झालेल्या क्षमता वृद्धीचा अभ्यास करणे इ. हा शोधनिबंधाचा प्रामाणिक उद्देश आहे.

**मुख्य शब्द (KeyWords):** ग्रामपंचायत, बीआरजीएफ, ग्रामीण विकास, पंचायत राज

**प्रस्तावना :-** समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात आरक्षणाच्या माध्यमातून विविध पदावर मागासवर्गीयाना संधी मिळाली विशेषतः राजकीय क्षेत्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणात आणि निर्णय प्रक्रियेमध्ये लोकप्रतिनिधी व पदाधिकारी म्हणून मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. राजकीय पदाबरोबर त्या पदाची सत्ता देखील त्या व्यक्तीकडे येते. सत्तेबरोबर अधिकार आणि नियंत्रण करण्याची शक्ती येते. अधिकाराबरोबर कर्तव्य ही येतात. कर्तव्यात नियोजनाचा समावेश होतो नियंत्रणात अमंलबजावणी पडताळणी आणि कार्यपुर्ततेचे विश्लेषण येते. ड्युबनच्या मते सत्ता म्हणजे निर्णय घेण्याची व कार्याला मान्यता देण्याची क्षमता तर लॉसवेल व काम्लान यांच्या मते, आकृतीबंध शक्ती म्हणजे सत्ता होय शक्तीला आकृतीबंध निर्णय घेण्याची सत्ता पदामूळे प्राप्त होते. म्हणून सत्ता असणारे पद म्हणजे आकृतीबंध होय.[] अशी सत्ता मागासवर्गीयांना आरक्षण धोरणामुळे पंचायतराज आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून प्राप्त झाली आहे. तेव्हा त्याचा निर्णय प्रक्रियेत सहभाग असतो का? हे जाणून घेण्यासाठी व ग्रामपंचायतीमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी तर मिळाली परंतू समाज व्यवस्थेत आजही प्रभावशाली जातीचे वर्चस्व ग्रामपंचायतीमध्ये आहे का मागासवर्गीय लोकप्रतिनिधीमध्ये B.R.G.F प्रशिक्षणातून त्याच्या भूमिकेत बदल झाला काय हे जाणण्याचा प्रयत्न या शोध निबंधात करण्यात आला.

**१. संशोधन पद्धती :-** B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय (ग्रा.प.) लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत बदल हा शोधनिबंध लिहण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आत्मा.

**२. तथ्य संकलन -** प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनामध्ये मुलाखत अनुसुची, निरिक्षणाचा अवलंब करण्यात आला आहे, तर दुय्यम साधन सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्र, व इंटरनेटचा आधार घेण्यात आला.

**३. नमुना निवड -** प्रस्तुत शोधनिबंधासाठी औरंगाबाद तालुक्यातील दहा (१०) ग्रामपंचायत मधील ३० वर्गीय लोकप्रतिनिधीची गैरसंभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहेतूक नमुना निवड पद्धतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**४. संशोधनाची उद्दिष्ट्येः-** १. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेतील वाढत्या सहभागाचा अभ्यास करण

2. B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

3. B.R.G.F प्रशिक्षणातून झालेल्या क्षमता वृद्धीचा अभ्यास करणे.

**५. गृहितके :** १. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे.

२. मागासवर्गीय लोकप्रतिनिधीना आपल्या अधिकाराच ओळख झाली आहे.

3. B. R. G. F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या ज्ञान, कौशल्य आणि क्षमताचा विकास झाला आहे.

मागास क्षेत्र अनुदाननिधी (B. R. G. F.) (Backward Regions Grant Fund Programme) या योजनेच्या माध्यमातून केंद्रशासनाच्या पंचायतराज

मंत्रालयाच्या व राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सक्रीय सहभागातून ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीना पायाभूत प्रशिक्षण देण्यात आले. यातून क्षमतावृद्धी करुन त्यांना त्याच्या अधिकाराची व कर्तव्ये याची माहिती करुन देण्यात आली लोकसहभागी ग्रामविकास आराखडा व त्याला अनुसरुन ग्रामपंचायत अंतर्गत सर्व अधिकाराची माहिती व्हावी हा हेतू या प्रशिक्षणाचा होता या अनुषंगाने प्रशिक्षणानंतर मागासवर्गीय लोकप्रतिनिधीच्या भूमिकेत काय फ्रदल झाला हे जाणून घेण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले.

**१. आपण B.R.G.F चे प्रशिक्षण पूर्ण केले का ?**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | होय | २७ | ९० टक्के |
| २. | नाही | ०३ | १० टक्के |
| | एकूण | ३० | १०० टक्के |

जेव्हा उत्तरदात्याना हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ९० टक्के लोकप्रतिनिधीनी सांगितले प्रशिक्षण पूर्ण केले तर १० टक्के लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षण पूर्ण केलेले नव्हते. कोणी दोन दिवस कोणी फक्त एक दिवसच पूर्ण केले होते. परंतू ९० टक्के लोकप्रतिनिधी B.R.G.F चे प्रशिक्षण पूर्ण केले होते.

निरिक्षणाअंती असे लक्षात आले की प्रत्येक मागासवर्गीय लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षणातून कोण-कोणती माहिती मिळते. शासनामार्फत प्रशिक्षण आहे तेव्हा आपण हजर राहणे आवश्यक आहे. आपणाला ग्रामपंचायतीच्या कारभाराची माहिती मिळावी व आपणाला पूर्ण माहिती असावी या हेतूने प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणाचा लाभार्थीना कोणता फायदा झाला याविषयी खालील प्रमाणे माहिती संकलित करण्यात आली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | प्रशिक्षणाचाआपणाला काय फायदा झाला. | २७ | ९० | टक्के |
| २. | अधिकार समजले | १८ | ६० | टक्के |
| ३ | कामकाजाची पद्धत समजली | ०७ | २३.५ | टक्के |
| ४ | योजनाची माहिती मिळाली | ०५ | १६.५ | टक्के |
| | **एकूण** | **३०** | **१००** | **टक्के** |

प्रशिक्षणाचा आपणाला काय फायदा झाला असा प्रश्न ३० उत्तरदात्यांना विचारण्यात आला तेव्हा १८ (६० टक्के) म्हणाले आम्हाला आमचे अधिकार समजले ७ (२३.५ टक्के) म्हणाले योजनाची माहिती मिळाली ६० टक्के लोकप्रतिनिधी म्हणाले आम्हाला ग्रामपंचायतीमध्ये काम करतांना आमचे अधिकार काय आहेत. हे माहित नव्हते परंतू प्रशिक्षणास आम्हाला आमचे अधिकार समजते. ग्रामपंचायतीचा कारभार कसा चालतो याची पूर्ण माहिती मिळाली.

**३. आपण दर महिन्याच्या मासिक सभेना हजर असता काय?** ग्रामपंचायतीच्या सर्व आर्थिक व्यवहारांना मासिक क्षेत्रात मान्यता मिळत असते. ग्रामपंचायतीच्या सर्व लोकप्रतीनीधीनी मासिक सभेला हजर राहणे प्रंधनकारक आहे तो प्रत्येकाच्या अधिकार आहे. जेव्हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | होय | १३ | ४३.५ | टक्के |
| २. | नाही | ०६ | २०.० | टक्के |
| ३. | कधी कधी | ११ | ३६.५ | टक्के |
| | एकूण | ३० | १०० | टक्के |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ३० उत्तरदात्यापैकी १३ (४३.५ टक्के) म्हणाले आम्ही दर महिन्याच्या मासिक सभेला हजर असतो तर ०६ (२०.० टक्के) म्हणाले आम्ही हजर राहात नाही ११ (३६.५ टक्के) म्हणाले आम्ही कधी-कधी हजर असतो.

मासिक सभेना हजर राहाणे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्यच आहे. परंतू फक्त ४३.५ टक्के मागासवर्गीय लोकप्रतिनिधी हजर असतात कधी-कधी हजर असणा-याचे प्रमाणही ३६.५ टक्के इतके आहे. २०.० लोकप्रतिनिधी हजर राहत नाही निरिक्षणाअंती असे लक्षात आले की, सतत असणा-या पॅनलचे सदस्य हजर असतात ते पॅनल विरोधी गटाचे असते त्या पॅनलचे सदस्य ग्रामपंचायतीच्या मासिक सभांना हजर राहत नाही.

**४. ग्रामसभेतील ठरावावर चर्चा होते का -** केंद्रात लोकसभा राज्यात विधानसभा गामपातळीवर गामसभा इतके महत्व ग्रामसभेला आहे. ग्रामविकासाच्या महत्वाच्या योजनाची वैयक्तिक लाभार्थी योजनेच्या लाभार्थ्याची निवड ग्रामसभेत केली जाते. इतके महत्व ग्रामसभेला आहे. या मार्फत ३० उत्तरदात्यांना विचारण्यात आले. कि ग्रामसभेतील ठरावावर चर्चा होते का?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | होय | १५ | ५० | टक्के |
| २. | नाही | ०७ | २३.५ | टक्के |
| ३. | सांगता येत नाही | ०८ | २६.५ | टक्के |
| | एकूण | ३० | १०० | टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ५० टक्के लोकप्रतिनिधी म्हणतात चर्चा होते तर २३.५ टक्के नाही म्हणतात २६.५ टक्के उत्तरदात्याना सांगता येत निरिक्षणाअंती असे तसात आले की ग्रामसभेत विषयपत्रके नुसार चर्चा होत नाही कारण २६.५ टक्के लोकप्रतिनिधीना सागताच आले नाही की, रावावर चर्चा होते की नाही ५० टक्के उत्तरदाते म्हणाले चर्चा चर्चा होते.

जोपर्यंत ग्रामसभा सक्षम होणार नाही. लोकशाही प्रळकटीकरणाची ही प्रक्रिया आहे. तेव्हा प्रत्येक लोकप्रतिनिधीला ग्रामसभेचे महत्व कळणे गरजेचे आहे.

**५. ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नातून मागासवर्गीयाच्या कल्याणासाठी किती टक्के निधी खर्च करतात.**

ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी हे त्या -त्या वार्डाचे नेतृत्व करत असतात. त्याच्या वार्डातील समस्या त्याच प्ररोप्रर येणारा केंद्र व राज्याचा निधी याची माहिती प्रत्येक लोकप्रतिनिधीला असणे आवश्यक आहे. तेव्हा मागासवर्गीयाच्या कल्याणासाठी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या किती टक्के निधी खर्च करतात हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | २० टक्के निधी खर्च | २७ | ९० | टक्के |
| २. | १५ टक्के निधी खर्च | ०३ | १० | टक्के |
| ३. | ३० टक्के निधी खर्च | ०५ | १६.५ | टक्के |
| | एकूण | ३० | १०० | टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जेव्हा मागासवर्गीय लोकप्रतिनिधी ना हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ०९ (३० टक्के) म्हणाले मागासवर्गीयासाठी २० टक्के निधी खर्च करतात तर १६ (५३.५ टक्के) म्हणाले ३० टक्के निधि खर्च करतात.

ख--या अर्थाने ग्रामपंचायतीच्या एकूण उत्पन्नातून मागासवर्गीयाच्या कल्याणासाठी १५ टक्के निधि खर्च करतात याप्राप्रात एकूण उत्तरदात्यापैकी ५३०५ टक्के उत्तरदात्यानी योग्य उत्तर दिले तर ३० टक्के म्हणाले २० टक्के तर ३० म्हणणा-याचे प्रमाण १६.५ टक्के होते.

**7. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत आपली भूमिका कशी असते**
आजही ग्रामपंचायतीच्या राजकारणात विशिष्ट जातीचा प्रभाव पहावयास मिळते तेव्हा ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत मागासवर्गीय लोकप्रतिनिधीची काय भूमिका असते हे जान्स घेण्यासाठी हा प्रश्न विचारण्यात आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | निर्णायक | ०७ | २३.५ | टक्के |
| २. | सहयोगाची | १७ | ५६.५ | टक्के |
| ३. | सांगता येत नाही | ०६ | २०.० | टक्के |
| | एकूण | ३० | १०० | टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, जेव्हा ३० उत्तरदात्याना हा प्रश्न विचारण्यात आज तेव्हा १७ (५६.५) टक्के लोकप्रतिनिधी म्हणाला आमची भूमिका ग्रामविकासासाठी सहयोगाची असते तर ७ (२३.५टक्के ) म्हणाले आमची भूमिका निर्णायक असते. ०६ (२०.० टक्के) म्हणाला सागता येत नाही. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत मागासवर्गीय लोकप्रतिनिधीची भूमिका ही ५६.५२ टक्के म्हणाले सहयोगाची असते २३.५ टक्के म्हणाले निर्णायक असते. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत गावातील हेवे दावे सोडून ग्रामविकासाचे ध्येय साध्य करणे आवश्यक असते.

**७. ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात आपण समाधानी आहात काय ?:-**
आजही ग्रामपंचायत स्तरावर उच्च जातीचे प्रभूत्व पाहावयास मिळते. ७३ व्या घटनादुरुस्तीने मागासवर्गीयाची संधी मिळाली परंतु ग्रामपंचायतीच्या प्रत्येक कार्यक्रमात याचा सहभाग असते असेनाही तेव्हा त्यांना हा प्रश्न विचारण्यात आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | निर्णायक | २३ | ७६.५ | टक्के |
| २. | सहयोगाची | ०४ | १३.५ | टक्के |
| ३. | सांगता येत नाही | ०३ | १०.० | टक्के |
| | एकूण | ३० | १०० | टक्के |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ३० उत्तरदात्यांपैकी २३ (७६.५ टक्के) म्हणाले समाधानी आहोत तर ४ (१०.० टक्के) म्हणाले काही प्रमाणात समाधानी आहोत.

जेव्हा मागासवर्गीय लोकप्रतिनिधींना असा प्रश्न विचारण्यात आला की, ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात आपण समाधानी आहात का तेव्हा ७६.५ टक्के लोकप्रतिनिधी म्हणाले समाधानी आहोत तर १३.५ टक्के म्हणाले आम्ही समाधानी नाहीत तर १०.० टक्के म्हणाले काही प्रमाणात समाधानी आहोत ग्रामपंचायतीच्या कारभारात मागासवर्गीय लोकप्रतिनिधीचा सहभाग वाढत आहे. असे निरिक्षणा अंती लक्षात आले.

**निष्कर्ष:-**

1. B.R.G.F प्रशिक्षणाप्राप्रात प्रश्न विचारला असता असे लक्षात आले. ९० टक्के लोकप्रतिनिधीनी प्रशिक्षण पूर्ण केले होते. ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रात व आपल्या अधिकाराप्राप्रात जाणून घेण्याची उत्सुकता असल्या कारणाने प्रशिक्षण पूर्ण केले

२. ६० टक्के लोकप्रतिनिधीना प्रशिक्षणातून आपले अधिकार व जप्राप्रदारीची ओळख झाली ग्रामसभा, मासिक सभा, यांची पूर्ण माहिती त्याना मिळाली होती.

३. मासिक सभेच्या उपस्थिती मार्फत४३.५ टक्के लोकप्रतिनिधीची दर महिन्याच्या मासिक सभेला होती तर ३६.५ टक्के कधी-कधी उपस्थित राहात होते. प्रशिक्षणातून त्यांना मासिक सभेचे महत्व कळाले होते.

४. ग्रामविकासाच्या निर्णय प्रक्रियेत ५६.५ टक्के लोकप्रतिनिधीची भूमिका ही सहयोगाची होती तर २३.५ टक्के निर्णायक होती राजकीय अभिसरणाची

प्रक्रिया ग्रामपातळीवर दोन आहे असे म्हणावे लागेल.

५. ७६.५ टक्के लोकप्रतिनिधी ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रत समाधानी होत ही जमेची प्राप्र होती तर १३.५ टक्के आजही ग्रामपंचायतीच्या कारभाराप्राप्रत समाधानी नव्हते हा प्रादल होणे गरजेचे आहे.

B.R.G.F प्रशिक्षणातून मागासवर्गीय लोकप्रतिनिधीनच्या क्षमता वृद्धीचा विकास झाला त्याच प्रारोप्रार त्यांना ग्रामपंचायतीची व्यवस्था समजली व आपले अधिकार आणि कर्तव्य याची ओळख झाली त्यांच्या भूमिकेत प्रादल झाला जोपर्यंत आपल्या भूमिकेचे अधिकार समजत नाही तोपर्यत प्रत्येक लोकप्रतिनिधीला आपली भुमिका कशी प्राजवावी हे कळत नही.

***संदर्भ सुची :-***

*१) पंचायतराज क्षमतावृध्दी - श्रृंखला नवनिर्माण प्रकाशन खोकडपूरा*

*२) मागासक्षेत्र अनुदाननिधी कार्यक्रम मार्गदर्शिका - पंचायतराज मंत्रालय भारत सरकार*

*३) मागासक्षेत्र अनुदाननिधी वाचन साहित्य - यशदा पुणे, राजभवन आवार वाणेर रस्ता पूणे*

*४) मुलभूत कार्यात्मक प्रशिक्षण वाचनसाहित्य - जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय*

*५) भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, सिरसाट शाम व प्रौनाडे भगवानसिंग - विद्या पप्र्लिशर्स औरंगाप्राद*